सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील
अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी
असलेल्या गावांमध्ये दोन अतिरिक्त
सवलती जाहीर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय- २०१६/ प्र.क्र.१ /म-७**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २२ एप्रिल, २०१६

**वाचा** :- १. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक - एससीवाय/२०१५/प्र.क्र.३११/म-७,दिनांक२०.१०.२०१५

२. शासन निर्णय क्रमांक -एससीवाय/२०१५/प्र.क.३११/ म-७, दिनांक १०.३.२०१६

३. शासन निर्णय क्रमांक - एससीवाय/२०१६/प्र.क्र.१/म-७, दिनांक- २३.३.२०१६

**शासन निर्णय :-**

राज्यातील सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या ११८६२ गावांमध्ये १) जमिन महसूलात सुट २) कृषि पंपाच्या चालू विज देयकात ३३.५ टक्के इतकी सुट ३) शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्का माफी ४) आवश्येक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर ५) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची विज जोडणी खंडीत न करणे अशा विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या होत्या. आता सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारीमध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या ११८६२ गावात खालीलप्रमाणे अतिरिक्त दोन सवलती लागू करण्यास शासन मंजूरी देत आहे.

१) शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती.

२) सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठन.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक असा आहे. हा आदेश डिजीटल सवक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(अशोक आत्राम)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

सर्व मुख्य अधिकारी जिल्हा परिषद

संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ मुंबई

सर्व मुख्य अभियंता, ग्रामीण / नागरी, पाणी पुरवठा

प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे

आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य , पुणे

महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर

महालेखापाल ½, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर

सर्व मंत्रालयीन विभाग

वित्त विभाग (व्यय-९)

निवडनस्ती, कार्यासन म-७

प्रत माहितीस्तव

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.मुख्य सचिवांचे , उप सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.मंत्री/राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय
पृ.क्र.मशा/कार्या-४/आरबा-/२/६२१/२०१६
दिनांक :- २५/६/२०१६

मूळ अर्ज चौकशी करुन प्रस्ताव सादर करण्या करीता/कार्यवाही करीता सर्व तहसिलदार [illegible] अग्रेषीत

जिल्हाधिकारी चंद्रपूर करीता